**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.०३ चा शपथेवर जबाब –**

माझे नाव – भिमाबाई भाउ रेपाळे

माझे वय – ४८ वर्षे

व्यवसाय – महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल, नगर तालुका पोलीस ठाणे, अहमदनगर.

राहाणार – भिंगार, अहमदनगर.

**सरतपास विधीज्ञ श्री.एस.पी.तडके यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

१. गुन्हा घडला त्यावेळी मी महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल या पदावर नगर तालुका पोलीस ठाणे येथे कार्यरत होते. घटना ही १९.०५.२०२४ रोजीची आहे. मला सदर गुन्हयाचा तपासाचा आदेश दिनांक १९.०५.२०२४ रोजी मिळाला होता. तो आदेश प्रकरणात दाखल आहे. तो मला दाखविण्यात आला. त्यावर सहा.फौजदार गुंजाळ यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.२१** देण्यात आली. त्यादिवशी मी आणि, पो हे कॉ खंडेराव शिंदे हे पोलीस ठाण्यात हजर असतांना सहा फौजदार भाऊसाहेब काळे यांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, निमगाव वाघा शिवारातील कुमार फलके निमगाव शिवारात त्याचे घराच्या पाठीमागे गावठी हातभट्टी दारू तयार करत होता. त्यानंतर सहा फौजदार भाउसाहेब काळे यांनी स्थानीक गुन्हे शाखा येथे पंचांना बोलावुन घेवुन आणि त्यानंतर आम्ही सर्व पोलीस कर्मचारी आणि दोन पंचां घेवुन छापा टाकण्यासाठी निमगाव वाघा येथे गेलो. आम्ही १६.३० वाजता तेथे छापा टाकला. त्याठिकाणी आम्हाला आरोपी मिळुन आला. त्याला पकडुन त्याचे नावगाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव कुमार दादाभाउ फलके असे

सांगितले. सदर घटनास्थळाची पो कॉ खंडेराव शिंदे यांनी पंचांसमक्ष झडती घेतली. त्याठिकाणी गावठी हातभट्टी दारूचे ३०० लिटर कच्चे रसायन दोन प्लॅस्टीकच्या बॅरेलमध्ये आणि ३५ लिटर गावठी हातभट्टीची दारू मिळुन आली. त्याची अंदाजे एकुण किंमत १८,५००/– होती. पो कॉ खंडेराव शिंदे यांनी पंचांसमक्ष पंचनामा केला. त्यातुन गावठी हातभट्टी तयार करण्याचे रसायन व गावठी हातभट्टी दारू एक एक बाटली १८० मि ली ची सिलबंद करून रासायनिक तपासणीकरता जप्त केली. मुद्देमाल जागीच नाश केला. त्यानंतर पो.कॉ. माने यांनी आरोपीविरूध्द फिर्याद दाखल केली. मला आता दाखविण्यात आलेली फिर्याद तिच आहे. ती नि.क्र.१५ वर आहे. त्यावर फिर्यादी आणि ठाणे अंमलदार यांची सही आहे. मला आता छापील एफ आय आर दाखविण्यात आला. त्यावर फिर्यादी आणि ठाणे अंमलदार यांची सही आहे. मला दाखविण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यावर माझी आणि पंचांच्या सहया आहेत. तो नि.क्र.१२वर आहे.

२. प्रकरणात दैनिक अहवाल दाखल केलेला आहे त्यावर ठाणे अंमलदार यांची सही आहे. त्याला **नि.क्र.२२** देण्यात आली. मी तपासा दरम्यान साक्षीदार भाऊसाहेब काळे आणि अतुल लोटके यांचे जबाब नोंदवले. मला आता दाखविण्यात आलेली मुद्देमाल पावती तिच आहे. त्यावर माझी आणि मुद्देमाल कारकुनाची सही आहे. त्याला **नि.क्र.२३** देण्यात आली. रासायनिक विश्लेषणाकरिता नमुना पाठविल्याबाबतचे पत्र प्रकरणात दाखल आहे. त्यावर माझी आणि सहा पो निरक्षक यांची सही आहे. त्याला **नि.क्र.२४** देण्यात आली. त्यानंतर मी मुद्देमाल घेवुन जाणाऱ्या पो कॉ सागर मिसाळ यांचा जबाब नोंदवला. रासायनिक तपासणीकरता पाठविलेल्या पत्राची पोहोच दाखविली. त्याला

**नि.क्र.२५** देण्यात आली. आरोपीस कलम ४१ अ फौजदारी प्रक्रीया संहितेनुसार दिनांक २०.०५.२०२४ रोजी नोटीसची बजावणी केली होती. मला दाखविण्यात आलेली नोटीस तिच आहे. त्यावर आरोपीची व माझी सही आहे. त्याला **नि.क्र.२६** देण्यात आली. आरोपीला दोषारोप दाखल करतेवेळी न्यायालयात हजर राहण्याबाबत समजपत्र दिले होते. ते प्रकरणात दाखल आहे. त्यावर आरोपीची व माझी सही आहे. त्याला **नि.क्र.२७** देण्यात आली. तपासा अंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचेविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ फ आणि ई नुसार दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. मी आरोपीला ओळखु शकतो. आज आरोपी न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.आर.पी. गोरे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u> –

३. मी मिळालेल्या गुप्त बातमीची बनावट ग्राहक पाठवुन खात्री केली नाही. छापा टाकण्याकरिता तोंडी आदेश दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्यक्ष पोलीसांनी छापा टाकला नाही तसेच त्यांना कुठलाही मुद्देमाल मिळुन आला नाही. आदेश केंव्हा मिळाला त्याची वेळ टाकलेली नाही. खाजगी वाहनाने गेलो त्याचे आर सी बुक हस्तगत केले नाही. निमगाव वाघा येथील स्थानिक साक्षीदारांचे मी जबाब नोंदविलेले नाहीत. तसेच जागा मालकाच्या मालकी हक्काबाबतचा कुठलाही दस्त मी जप्त केला नाही. मुद्देमाल कारकुनाचा मी जबाब नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, इतर गुन्हयातील मुद्देमालसुध्दा रासायनिक तपासणीकरिता पाठविण्यासाठी जमा असतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी कुठलाही नमुना रासायनिक तपासणीकरिता सिलबंद केला नाही तसेच पाठविलासुध्दा नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळेच सि ए रिपोर्ट

आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा पोलीस ठाण्यातच तयार केला आणि तेथेच पंचांच्या सहया घेतल्या. हे मला सांगता येणार नाही की राजेंद्र पालवे आणि दादु चक्रवर्ती हे नगर तालुका पोलीस ठाण्याच्या बऱ्याच प्रकरणात पंच म्हणुन आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे तपासात आरोपीविरूध्द कुठलाही पुरावा आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सहकाऱ्यांना मदत व्हावी म्हणुन मी खोटा तपास केला व खोटे दोषारोपपत्र दाखल केले आणि खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत
जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.

सही/-
(माधुरी रा. खनवे)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं.०४, अहमदनगर

दिनांक २२/१२/२०२५